# पनवेल तालुक्यातील आदिवासींच्या समस्या

सौ. विजयश्री राजेंद्र पाटील
एम. फिल इतिहास
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे



## प्रास्ताविक ः

विकसनशील भारताची तंत्रज्ञान ,विज्ञान यातील दैदिप्यमान प्रगती त्याला एकविसाव्या शतकात विकसित राष्ट्रांकडे घेऊन जात असताना त्या रथात आरूढ झालेल्या भारतीय समाजातील प्रत्येक घटक केवळ साक्षर होणे इतकेच अपेक्षित नसून त्याने सुशिक्षित नागरिक होणे फार गरजेचे आहे .

उदरनिर्वाहाची साधने प्राप्त झाल्यानंतर मानवाने खेडयात व सुधारलेल्या लोकवस्तीत राहणे पसंत केले . परंतु काही भूमिपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम भागात असलेल्या डोंगरकपारीत आपला तळ ठोकला. आपल्याच रूढी व परंपरांना पालीसारखे चिटकून राहणा–या फळाफुलांच्या, झाडापाल्याच्या चवीने समाधान पावणा–या आदिवासी जमातीचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखे असते. या लोकांचा जंगलचे राजे , धरतीची लेकरे , आदिम जमाती , आदिवासी समाज असा उल्लेख केला जातो . या आदिवासी जमातींसाठी अनेक सोईसुविधा शासन पुरवित असले तरी आजही अनेक सुखसुविधांपासून वंचित असा हा समाज वर्षानुवर्षे दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा व जुलूम यांच्या अंधारात भटकत डोंगरकपारीत खडतर जीवन जगत आहे . अशा या समाजाच्या वाटचालींचे ऐतिहासिक महत्त्व व पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे .

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुका औद्योगिक दृष्टया एक विकसित शहर आहे . पनवेलचा परिसर हा औद्योगिक परिसर म्हणून नावारूपाला आला आहे . देशाची आर्थिक राजधानी मुंबईच्या निकट व पुण्यामुंबईला मध्यवर्ती असणारा हा भूभाग आहे . पनवेलचा नागरीकरणाचा वेग अलिकडे झपाटयाने वाढला आहे . भविष्यात येऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे नोकरीच्या खूप मोठया संधी येथे उपलब्ध होतील मात्र पनवेल तालुक्याची सुमारे 6 ते 7 टक्के लोकसंख्या दुर्गम,डोंगराळ भागात वास्तव्य करणारा आदिवासी समाज आहे . आजही हा समाज उपेक्षेचे जीवन जगत आहे . पनवेलचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर या समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्यासाठी विकासाच्या योजना राबविणे अत्यावश्यक आहे . पनवेल तालुक्यातील आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास प्रस्तूत शोधनिबंधातून घेतला आहे .

## पनवेल तालुक्यातील आदिवासींच्या समस्या ः

आदिवासींची समस्या ही केवळ आर्थिक नसून सामाजिक व आर्थिक स्वरूपाची देखील आहे . त्यात अनेक सामाजिक प्रश्न गुंतलेले आहेत . कुठलीही समस्या ही पूर्णतः आर्थिक अथवा सामाजिक स्वरूपाची असू शकत नाही . समस्येला विविध अंगे असू शकतात . समस्येचा तोल कोणत्या अंगावर अधिक आहे हे लक्षात घेणे आवश्यक ठरते . आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा त्यादृष्टीने विचार करणे अधिक उचित ठरेल .

### 1. दारू आणि व्यसनाधिनता ः

आदिवासींमध्ये दारूचा वापर धार्मिक व सामाजिक विधींशी जोडलेला आहे . दारू पिणारे सर्व जमातींत आहेत पण सर्व जमातच दारू पिणारी असणे त्याहून वेगळे आहे . त्यामुळे आदिवासींमधील कोणतीही व्यक्ती या व्यसनापासून वाचू शकत नाही . व्यक्तीला व्यसनमुक्त करणे शक्य आहे पण सर्व जमातीला व्यसनमुक्त कोण करणार . थोडक्यात आदिवासी व्यक्तीला व्यसनमुक्त होण्याचे सांस्कृतिक व सामाजिक स्वातंत्र्य असू शकत नाही . दारू पिणे हे समाजस्वास्थ्याला हानीकारक आहे हे सूत्र आदिवासी समाजजीवनाला मान्य नाही . ही व्यसनाधिनता सर्व जमातीतून नष्ट केल्याशिवाय त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाची मोठी आशा करता येणार नाही . [1]

विशेष महत्त्वाची बाब म्हणजे आदिवासींमधील कातकरी समाजाची लोकसंख्या प्रत्येक दशकात जेवढी वाढायला हवी होती तेवढी ती वाढत नसून उलट ती घटत आहे असे जनगणनेच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे . देशात लोकसंख्या वाढ घटत असणा–या ज्या पाचदहा आदिम जमाती आहेत त्यात कातकरी जमातीचा समावेश आहे . आदिवासींच्या इतिहासामध्ये एक दिवस असा उजाडेल की कातकरी या आदिम जमातीचे नावनिशाणही शिल्लक राहणार नाही . [2]

**2 . अज्ञान व आरोग्य :**

आदिवासींच्या सामाजिकतेचा दुसरा प्रश्न अज्ञान व आरोग्याचा . त्यांच्या विकासातील ती एक धोंड आहे . दुस-या कोणत्याही समाजापेक्षा आदिवासी समाजात आरोग्यविषयक नियमांविषयी व औषधोपचाराविषयीची फार अनास्था आढळते . स्वच्छतेची राहणी, शुद्ध व सप्रमाण आहार ही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करण्याची दोन साधने आहेत . परंतु बहुतेक सर्व सामाजिक प्रश्न आर्थिक प्रश्नांशी निगडित असल्यामुळे गरीबांना स्वच्छतेची राहणी व सप्रमाण जेवण परवडत नाही . स्वच्छता बव्हंशी विपूल पाणीपुरवठयावर अवलंबून असते . पण जिथे पिण्याच्या पाण्याची सोय नाही तिथे अंघोळ आणि कपडे धुवायला कोठे मिळणार . नोव्हेंबर डिसेंबर उजाडले की आदिवासी भागात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागते . पुढील पाचसहा महिने पाणी ही आदिवासींची समस्या होऊन बसते . आदिवासी गावांमध्ये व पाडयांमध्ये ही समस्या उन्हाळयात 'पाण्याच्या टिपवणीचे' किंवा चार पाच मैल अंतराचे डोंगर उतरून पिण्यासाठी हंडे दोन हंडे पाणी आणण्याचे स्वरूप धारण करते . टिपवणीच्या पाण्यामुळे रक्ती हगवण, कृमी, नारू, कावीळ, डायरिया यासारखे रोग होतात . [3]

**3 . कुटूंबसंस्था व लग्नविधीचे खर्च :**

आदिवासी जमातीत लग्नकार्य करण्यासाठी कर्जाची जरूरी भासते . अनेक लोक कर्ज काढून लग्न करतात . जवळ असलेले पैसे खर्च करून लग्न केलेतर लोक आपल्याला श्रीमंत समजतील व सावकार देखील कर्ज देणार नाही असे आदिवासींना वाटते . आदिवासींच्या कर्ज बाजारात लग्नाच्या खर्चाने कर्जात जेवढी भर पडते . तेवढी दुस-या कोणत्याही कारणाने पडत नाही . कर्जामुळे आपण सावकाराचे गुलाम बनतो, लाचार बनतो याची आदिवासींना जाणीव राहत नाही . लग्नाचा वस्ता, वोलाचा खर्च, दहेज, मानपान, जमातींची जेवणे या खर्चाने आदिवासी संपूर्ण उघडा होतो . [4]

**4 . नकली आदिवासी :**

आदिवासी, दलितांचा मागासलेपणा कमी करण्यासाठी संविधानाने जाहिर केलेल्या सवलतींचा हेवा अन्यजनांना वाटणे स्वाभाविक आहे . त्यामुळे संविधानाने जाहिर केलेल्या सुपात्र सवलतदारांना बनावट मागासलेले किंवा मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले नकली मागासलेले लोक सतत दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात . परिणामी ख-या मागासलेल्या सवलतदारांना नोकरी धंदयात तसेच शैक्षणिक सवलतीत मागे रहावे लागते . उदा . हलबा आदिवासी जमातींच्या नावावर कोष्टी व हलबा कोष्टी तर महादेव कोळी किंवा डोंगरकोळी या आदिवासी जमातींच्या नावावर सूर्यवंशी कोळी, पानभरे कोळी, मच्छिमार कोळी, सोनकोळी या जमाती सध्या राजरोसपणे फायदा उठवत आहेत . प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे या कृत्यांना राजकीय हेतूपोटी पाठीशी घालून ख-या आदिवासींवर अन्याय केला जातो . [5]

**5 . कुपोषण आणि बालमृत्यू :**

पावसाळी हंगाम सुरू झाला की पनवेल तालुक्यातील ब-याच आदिवासी भागातील वाहतुक ठप्प होते . याच हंगामात आदिवासी भागातील आदिवासी जनतेसमोर आरोग्य आणि धान्य पुरवठयाची समस्या उभी राहते . पावसाळी हंगामात कुपोषण आणि बालमृत्यू आदिवासी भागात कधीच चूकत नाही . अनेक ठिकाणच्या बालमृत्यूची खबर वृत्तपत्रांपर्यंत पोहचत नाही म्हणून ती जगासमोर येत नाही .

आदिवासी भागात पूर्वी रोगाची साथ येऊन लोकं तडकाफडकी मरत असत . लहान बालकांच्या मृत्यूची एकामागून एक अशी अखंड मालिका दिसून येई . अंधश्रद्धेने लोक महामारीचा रोग फैलावला आहे या भावनेने अंगारे धुपारे करत . त्यातून त्यांची अपरिमित हानी होई . पण केवळ दैववादावर भरोसा ठेवून लोक जीवन जगत असत . अशा मृत्यूचक्रात अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत . खरे तर या समस्येचे मुळ आदिवासींच्या दारिद्रयात आणि उपासमारीत आहे . बेरोजगारीमुळे कामधंदा नाही, पैसा नाही, उत्पादन नाही अशी परिस्थिती आदिवासींची आहे . आदिवासी कुपोषणाचा प्रश्न आजचा नाही . शासानाने अन्न सुरक्षा कायदा आणला . या कायदयान्वये आदिवासींना माणशी पाच किलो धान्य दिले जाते . पण बाकी अन्न विकत घेण्यासाठी त्या गरीब पिडित आदिवासींजवळ पैसा तर पाहिजे ना . आजही पनवेल मधील दुर्गम भागात जाण्यासाठी रस्ते नाहीत . कागदपत्रांचा खेळ पाहिला तर आदिवासी लोकसंख्येवर नऊ टक्के इतका निधी देणे बंधनकारक आहे परंतु तो निधी आदिवासी पर्यंत पोहचतच नाही . [6]

**6 . मजुरांची समस्या :**

आदिवासी मजुरांच्या समस्या जाणून घेण्यासाठी धोदाणी, मालडुंगे, वांगणी, गारमाळ, वाघाचीवाडी, चांदणेडोंगर इत्यादी वाडयांचा सर्वेक्षण केला . या बहुतांश वाडया आदिवासी उपयोजनेत येणा-या वाडया आहेत . पाचशे लोकवस्तीपासंन पन्नास लोकवस्ती असणा-या या वाडया आहेत . निवडलेल्या वाडयांत 30 टक्के शेती करणारे तर 70टक्के मजुरी करणारे आढळले . स्थानिक क्षेत्रांत मजुरांच्या संख्येच्या प्रमाणात रोजगार हामीची कामे उपलब्ध होत नाहीत . सर्वेक्षणात असे आढळून आले की पावसाळा संपला की ही कुटुंबे स्थलांतर करतात . स्थलांतर करणा-या मजुरांत साक्षरतेचे प्रमाण केवळ पाच टक्के एवढेच आढळून आले . आणि मजुर स्त्रियांत साक्षरतेचे प्रमाण केवळ एक टक्काच आढळले . या कुटुंबांकडे बक-या व कोंबडया सोडल्या तर कोणतीच स्थावर मालमत्ता आढळून आली नाही . कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न पाचहजाराच्या आत असल्याचे आढळून आले .

या पाहणीवरून असा निष्कर्ष निघतो की ज्या प्रदेशातून आदिवासींचे स्थलांतर होते तिथे रोजगार हमीची कामे स्थानिक गरजेइतकी मिळू शकतील व स्थलांतर रोखू शकतील इतकी उपलब्ध नाहीत . जी रोजगार हमीची कामे जवाहर रोजगार योजना, इंदिरा आवास योजना, मृदा संधारण, वन लागवड इत्यादी योजनांव्दारे उत्पन्न होतात त्यातून अधिक माणसांना मजुरी देणारी कामे नसतात .

**स्थलांतराची कारणे :**

1 . पनवेल तालुक्यात भूमिहिन आदिवासींची संख्या मोठी आहे . त्यांचे उदरनिर्वाहाचे पूरक साधन मजुरीच आहे . त्यासाठी त्यांना दररोज रोजगार मिळणे जरूरीचे असते . परंतु या भागात नियमित रोजगार मिळत नसल्याने मजुरांना कामाच्या शोधात रहावे लागते .

2 . ज्या काही आदिवासींकडे जमिन आहे ती हलक्या प्रतीची असल्यामुळे त्यातून मिळणारे उत्पन्न वर्षभर पुरत नाही . त्यामुळे बरेचसे आदिवासी शेती हंगामातनंतर

कामाच्या शोधात असतात .

3 . पनवेल तालुक्यातील बराचसा आदिवासी भाग हा डोंगराळ असल्याने जमीन अत्यंत हलक्या प्रतीची आहे . बागायतीचे प्रमाणही कमी आहे .

महत्त्वाची बाब म्हणजे आदिवासी मजुर स्थलांतर करताना आपल्याबरोबर लहान मुलांनाही घेऊन जातात . त्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहतात . त्यातून आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण होतो . मजुरांना उघडयावर अगर झोपडया करून रहावे लागते . त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते . स्थलांतरामुळे मुकादमासारख्या मध्यस्थी व्यक्तीकडून आदिवासींची पिळवणूक होते .

## संदर्भ साहित्य :


1 . डॉ . गोविंद गारे आदिवासींचे प्रश्न , पृष्ठ 8

2 . मिलिंद बोकील 'कातकरी विकास की विस्थापान', पृष्ठ 79

3 . डॉ . गोविंद गारे आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, पृष्ठ 10

4 . उपरोक्त पान– 16

5 . डॉ . गोविंद गारे 'आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन', पृष्ठ 17

6 . साप्ताहिक 'आदिवासी सम्राट' 10 फेबुवारी 2016